CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ वे | अंक : २७ वा | शुक्रवार दि. १ डिसेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

**न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे**



डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### गांजा तस्करी करताना गुजरातच्या दोघांना अटक

**शिरपूर ।** शिरपूर बसस्थानकातून तस्करीद्वारे गुजरातमध्ये गांजा घेऊन जाण्याच्या प्रयत्नात दोन युवकांना शहर पोलिसांनी अटक केली. या कारवाईत दोन युवकांना अटक केली असून, दोघेही गुजरातमधील रहिवासी आहेत. बसस्थानक परिसराची टेहळणी केली असता दोन युवक संशयास्पद हालचाली करताना आढळले. दोघांच्या खांद्यावर बॅगा होत्या. बॅगेत काय आहे, अशी विचारणा केल्यानंतर त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांचा संशय बळावल्याने त्यांनी संशयितांना ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात आणले. बॅगच्या झडतीत १२ किलो ८४० ग्रॅम ओलसर गांजा आढळला. गांजासह पोलिसांनी संशयितांचे मोबाईलही जप्त केले.

### धुळे शहरात जोरदार पाऊस

**धुळे ।** धुळे शहरात व परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वारा, ढगांचा गडगडाट तर विजांच्या कडकडटासह जोरदार पावसाला सुरूवात झाली. सुमारे अर्धा ते पाऊण तास झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाले. एकच धावपळ उडाली. रात्री उशिरापर्यंत पुर्ववत झालेला नव्हता.

# स्मशानभूमीसाठी मनपाच्या स्थायी समितीच्या सभेत नगरसेवक चौधरींना अश्रु अनावर

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात ८०० कोटी रुपयांची विकासकामे केली असं आम्ही म्हणतो, परंतु दोन कोटींचे टॉवर गार्डनचे काम झाले नाही,शाळा क्र.१४ साठी भांडावे लागत आहे. भाजपाच्या महापालिकेच्या सत्ता काळात एक तरी मॉडेल शाळा व्हावी, परंतु प्रशासन केवळ बघु, करु या भुमीकेत आहे. महापालिकेवर आपला सत्ताधार्यांचा वचक का नाही, असा अंर्तमुख करणारा सवाल भाजपाचे नगरसेवक हर्षकुमार रेलन यांनी स्थायी समितीच्या सभेत उपस्थित केला तर देवपुरच्या वलवाडी भागातील स्मशान भुमीच्या दुरवस्थेचा प्रश्न मांडताना नगरसेवक नरेश चौधरी यांना अश्रु अनावर झाले.

स्थायी समितीच्या आजच्या सभेत नगरसेवक हर्षकुमार रेलन यांनी नेहमीप्रमाणे जोरदार बॅटींग केली. विषय पत्रिकेवरील २०२ क्रमांकाचा विषय हा मनपाच्याजागेवर जुनी हेरीटेज इमारतनुतनीकरण डिजिटलायझेशन व फर्निचर करण्यासाठी आर्केटेक एम.एस.काझी यांच्या नियुक्तीचा होता. या कामासाठी आ.सत्यजीत तांबे यांनी एक कोटींचा निधी दिला असूनत्यांनीच आर्कीटेक काझी यांच्या नियुक्तीची शिफारस केली होती. या विषयावर हेरीटेज बिल्डींगचे काम करण्यासाठी किती लोकांनी स्वारस्यदाखविले असा सवाल रेलनयांनी विचारला त्यावर अभियंता शिंदे यांनी सत्यजीत तांबेंनी १ कोटी रुपये हेरीटेजसाठी दिले आहे. कोणाचाही अर्ज आला नाही. परंतु ठेकेदाराचे प्रेझेंटेशन पाहुन काम देवू असे सांगितले. सभापती यांनी देखील टेंडर न काढता काम देणे योग्य आहे का असा सवाल केला.





### शाळा नं.१४ ची टेंडरची प्रक्रिया लवकरच

**शाळा नं.१४ संदर्भात दस्तुरखुद्द पालकमंत्र्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देवुनही काम का मार्गी लागत नाही? असा प्रश्न हर्षकुमार रेलन यांनी उपस्थित केला. तसेच संबंधित ठेकेदाराशी यासंदर्भात चर्चा केल्यानंतर त्यांनी मनपाच्या कामांची बीले निघत नसल्याची नाराजी व्यक्त केली. त्यावर शहर अभियंता श्री.शिंदे यांनी, मी सदर ठेकेदाराशी सभा संपल्यावर तात्काळ संपर्क साधून आठ दिवसात टेंडर प्रक्रिया राबविण्यात येईल, असे आश्वासित केले. दरम्यान, शहरातील टॉवर गार्डनचे काम दोन कोटींकरीता रखडले आहे, अशी नाराजीही हर्षकुमार रेलन यांनी यावेळी व्यक्त केली. त्यावर श्री.शिंदे यांनी याप्रकरणी आलेल्या तक्रारींमुळे काम रखडल्याचे उत्तर दिले.**

# दुचाकी चोरणारी टोळी जेरबंद



### धुळे एलसीबीची कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

मोटारसायकल चोरींच्या गुन्ह्यांना एलसीबीने रडारवर घेतले असून आज सलग दुसर्या दिवशी मोटारसायकल चोरीच्या ७ गुन्ह्यांची व एका घरफोडीची उकल करण्यात आली. एलसीबीच्या धडाक्यामुळे मोटारसायकल चोरटे पूर्णतः बिथरल्याचे चित्र आहे.

शहरातील गुरूद्वाराच्या पुलाखाली तिघे चोरटे उभे असल्याची गुप्त माहिती एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकाला पाचारण केले असता फैजान मुजम्मील अन्सारी (रा. कबीरगंज) व अन्य दोन विधीसंर्घर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्यांच्याकडे प.देवपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरलेली बजाज पल्सर मिळून आली. पोलिसांनी तिघा भामट्यांना हिसका दाखवताच त्यांनी सरदार हॉल शेजारच्या काटेरी झुडपात ठेवलेल्या दोन स्प्लेंडर मोटारसायकली काढून दिल्यात. तसेच त्यांच्या घराजवळूनही पाच मोटारसायकली हस्तगत झाल्यात. यात चार स्प्लेंडर, हिरो आणि होंडा कंपनीच्या एकेक दुचाकीचा समावेश आहे. रिकव्हर केलेली दोन वाहनेवगळता इतर मोटारसायकल चोरीचे गुन्हे देवपूर, अमळनेर, पारोळा, सुरत, मारवाड, मालेगाव आदी ठिकाणी दाखल आहेत. त्यामुळे एलसीबीने ७ मोटारसायकलीचे गुन्हे उघडकीस आणण्याची कामगिरी केली आहे.विधीसंघर्षीत बालकावरही विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी एसपी श्रीकांत धिवरे, एएसपी किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय दत्तात्रय शिंदे, पीएसआय अमरजीत मोरे, पोना. रवीकिरण राठोड, पोकॉ. सुशील शेंडे, हर्षल चौधरी यांनी केली आहे.

# पोलीस भरती प्रक्रियेसाठी तरुणांची निदर्शने

**धुळे । प्रतिनिधी**



राज्यात सन २०२१ नंतर पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. यामुळे पोलीस भरतीची तयारी करणार्या तरुणांमध्ये निराशेचे वातावरण आहे. तरी आगामी कळात येणारी पोलीस भरती प्रक्रिया लवकरात लवकर राबविण्यात यावी, अशी मागणी करत आज इच्छुक उमेदवारांनी जिल्हाप्रशासनाला निवेदन दिले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील गोरगरीब, शेतकर्यांच्या मुलांचे स्वप्न असते की सरकारी नोकरीत रुजू होवून आपल्या परिवाराची मान उंचवावी. त्यासाठी असंख्य तरुण पोलीस भरतीचा सराव करत असतात. मात्र, सन २०२१ नंतर पोलीस भरतीची जाहिरात निघालेली नाही. त्यामुळे पोलीस भरतीचा सराव करणार्या तरुणांमध्ये प्रचंड निराशेचे वातावरण आहे. तरी सन २०२३ या वर्षासाठी लवकरात लवकर पोलीस भरती जाहीर करावी, तसेच आमची मागणी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचविण्यात यावी, अशी मागणीनिवेदनातून केली आहे. निवेदनावर भावेश भदाणे, महेश चौहान, महेश पाटील, गौरव अहिरराव, अतुल चौधरी, जितू बिडकर, अविनाश मदने, गौरव पारखे, सचिन सोनार, आशिष घुगरे, रोहित शिरसाठ, अनिकेत सोनार, बंटी चौधरी, निलेश चौहान, आकाश चौधरी, राकेश घुगरे, सागर नगराळे आदींची नावे आहेत.

# दोंडाईचा येथे अपघातात मोटारसायकलस्वार ठार

**दोंडाईचा ।** येथील नगर परिषदेच्या इमारतीसमोर मंगळवारी (ता. २८) मोटारसायकलस्वार ट्रक अपघातात जागीच ठार झाला. रात्री आठच्या सुमारास कुंभारे (ता. शिंदखेडा) येथील सुनील हिलाल पाटील (वय ४०) या तरुण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.

दोंडाईचा येथून कुंभारे स्वतःच्या घरी जात असताना अर्धाकृती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळील नगर परिषदेच्या इमारतीसमोर हा अपघात झाला.मालवाहू ट्रक (एमएच १८, बीए २०१६) भरधाव जात होता. चालकाने हुलकावणी दिल्याने सुनील पाटील याच्याकडे असलेली मोटारसायकल (एमएच १४, ईजी १६३३) चाकाखाली आल्याने जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, परिसरात नागरिकांची तोबा गर्दी झाली होती. मृत तरुणाचा भाऊ दीपक कुवर (पाटील) यांनी दोंडाईचा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

# कर्मचारी-शिक्षकांचा बेमुदत संपाचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**

राज्यातील १७ लाख कर्मचारी व शिक्षक मार्च २०२३ मध्ये बेमुदत संपावर गेले होते. त्या पाश्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मध्यस्थी करून समन्वय समिती बरोबर चर्चा करून जुनी पेन्शन योजना लागू करण्या संदर्भात आर्थिक व सामाजिक सुरक्षितता देऊन पेन्शन योजना लागू करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले होते, त्या पाश्वभूमीवर त्रिसदस्यीय समिती नियुक्त करून तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते मात्र सदरहू समिती ने सहा महिन्यांनी शासनास अहवाल सादर केला आहे. त्यामुळे सदरहू अहवाल शासनाने तात्काळ जाहीर करुन जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागु करण्याची घोषणा करावी. नाहीतर १४ डिसेंबर पासून शिक्षकांनी बेमुदत संपाचा इशारा दिला आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, चतुर्थश्रेणी व ड्रायव्हर ची सेवा भरती सुरू करा, नविन शैक्षणिक धोरण थांबवा, शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरण थांबवा, बक्षी वेतन त्रुटी समिती ने अहवालाचे पुनर्विलोकन करून विशेषत लिपीक वर्गीय कर्मचारी व संवर्गावर झालेला अन्याय दूर करावा, आठव्या वेतन आयोगाची घोषणा करा , खातेनिहाय व संवर्ग संघटनेच्या प्रलंबित मागण्या व इतर १७ प्रलंबित मागण्या प्रकरणी दिलेल्या आश्वासना प्रमाणे सोडविण्यात याव्यात, बेमुदत संपावर जाण्याची वेळ शासनाने आणली आहे. शासनाने नोंद घ्यावी यासाठी सरकारी निमसरकारी कर्मचारी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती च्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांच्या कडे समन्वय समिती चे निमंत्रक डॉ संजय पाटील, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अशोक चौधरी, सुधीर पोतदार, सुरेश पाईकराव, चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाचे एस यु तायडे, माध्यमिक शिक्षक संघटनेचे दिलीप पाटील, दिनेश महाले, कल्पेश माळी, एन पी एस हटाव संयुक्त समिती चे भुषण पाटील, प्रा बी ऐ पाटील, राजेंद्र पाटील, देवानंद ठाकुर , प्रतिभा घोडके, किशोरी अहिरे हरणे, कविता पंडीत आदींच्या शिष्टमंडळाने शासनाला नोटीस देण्यात आली.



# जिल्हा रुग्णालयात पोलीस चौकी उभारण्याची मागणी

### रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे एसपींना निवेदन

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालयात परवा एका अज्ञात इसमाने कर्मचाऱ्याला धक्काबुक्की केल्याचा प्रकार घडला. रुग्णालयात असे प्रकार नेहमीच होत असल्याने या ठिकाणी पोलीस चौकी उभारण्यात यावी, अशी मागणी रुग्णालयातील कर्मचार्यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे तसेच जिल्हा शल्यचिकित्सक दत्ता देगावकर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दि.२८ रोजी जिल्हा रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागात एका अज्ञात इसमाने कर्मचार्याला शिवीगाळ करून धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाचारण केल्यानंतर पोलिसांनी सदर इसमाला तंबी देत त्याच्याविरुध्द शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला. तसेच सदर घटनेचा निषेध नोंदवला. निवेदन देतेवेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश भडांगे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ.अभय शिनकर, डॉ.विशाल पाटील, डॉ.हिमांशू सोनवणे, डॉ .मोसिन मुल्ला डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीची मंत्री छगन भुजबळ यांनी केली पाहणी

**लासलगाव। प्रतिनिधी**

वादळ, गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतपीकांचे अतोनात नुकसान झाले असून अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनस्तवर विशेष निधीकरीता तसेच अवकाळीमुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी क्रॉप कव्हर योजना राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. आज येवला व निफाड तालुक्यातील वादळ, गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपीकांच्या नुकसानीची पाहणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी समवेत उपविभागीय अधिकारी येवला बाबासाहेब गाढवे, उपविभागीय अधिकारी निफाड हेमांगी पाटील, येवला तहसिलदार आबा महाजन, निफाड तहसिलदार शरद घोरपडे, येवला तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड, निफाड तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे हे जलदगतीने करण्यात यावेत यात एकही बाधित शेतकरी सुटता कामा नये. मंत्री छगन भुजबळ यांनी येवला तालुक्यातील कातरणी, सोमठाण देश व निफाड तालुक्यातील वेळापूर, पिंपळगाव नजिक, शेतपीकांच्या नुकसानीची पाहणी केली.



# लुटारूंच्या शर्यतीतून वाहनचालकांचा प्रवास थांबणार कधी?

मुंबई- आग्रा महामार्गवर प्रवास करताना आपला प्रवास सुखकर व्हावा यासाठी महामार्गाची निर्मिती करण्यात आली. तसेच वरखेडी फाट्याजवळील नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता व्हावी यासाठी हा प्रशस्त रस्ता तयार करण्यात आला आहे. परंतु सध्या या सुसाट महामार्गावरील प्रवाशांना मात्र लुटारूंच्या शर्यतीतून जीवघेणा प्रवास थांबणार तरी कधी? याकडे व्हॅनचालकांसह धुळेकर नागरिकांचे लक्ष लागले आहे. महामार्ग लुटारुंचे केंद्र बनत आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये रस्ता लुटीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याच दरम्यान धुळे शहरापासून काही किलोमीटर अंतरावर रास्ता लुटीची घटना घडली आहे. यात दुचाकी अडवून तब्बल ७ लाख रुपये लुटून फरार झाले. गेल्या अनेक दिवसांपासून असे प्रकार घडत असताना पोलिसांना मात्र याचा थांगपत्ता लागत नसावा. त्यामुळे असे प्रकार रोखले जात नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणीच्या महामार्ग निर्मितीच्या त्रुटी समोर येऊ लागल्या आहेत. मात्र या महामार्गावर लुटारुंच्या टोळ्या कार्यरत झाल्या आहेत. लुटीच्या घटना वारंवार घडत असताना पोलिसांना मात्र याचा सुगावा लागत नाही. परिणामी लुटारुंचे धाडस वाढत आहे. पोलिसांचाच अशा प्रकारांना पाठींबा मिळत असावा, असा आरोप प्रवाशी वर्गातून होऊ लागला आहे. त्यामुळे पोलिसांच्या प्रतिमेला तडा जात असल्याचे बोलले जात आहे. अशा स्थितीत पोलिस लुटारुंना शोधून योग्य शासन केल्याशिवाय पोलिसांची प्रतिमा सुधारणार नाही. अशी देखील चर्चा नागरिक व प्रवासामध्ये आहे.



### पोलीस प्रशासन काय भूमिका घेणार?

**मुंबई- आग्रा महामार्गावर लुटारुंच्या टोळीचा हैदोस सुरू आहे. रात्रीच्यावेळी ट्रक किंवा कारवर दगडफेक करून लुटमार करण्याचा प्रयत्न होत आहे. असाच प्रकार समोर आला आहे. प्रवाशांची वाहने थांबवून चालकाना मारहाण करतात. तसेच त्यांच्याकडील किंमती ऐवजही लुटुन नेतात. त्यामुळे या महामार्गावरील चोरट्यांचा महामेरू कायमचा रोखण्यासाठी पोलीस प्रशासन नेमकी काय भूमिका घेणार? याकडे महामार्गावरील ग्रामस्थ, प्रवाशांचे लक्ष लागले आहे.**



शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

**विनम्र अभिवादन!**



एकदा फुललेले फुल पुन्हा फुलत नाही,
एकदा मिळालेला जन्म पुन्हा मिळत नाही,
हजारो माणसे मिळतील आयुष्यात,
पण आपल्या लाखो चुकांना क्षमा करणारी
आई पुन्हा मिळत नाही...!

आई, तुझी आठवण आम्हाला नेहमी प्रेरणादायी ठरते..

आदर्श माता कै.सौ.लिलावती आत्माराम पाटील
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

✻ आपले ✻
चंद्रशेखर आत्माराम पाटील (मुलगा)
विजय आत्माराम ठाकरे (मुलगा)
डॉ.सौ.हेमलता भरत पाटील (मुलगी)
सौ.संगीता कमलेश पाटील (मुलगी)
समस्त पाटील परिवार

दैनिक लक्ष महाराष्ट्र
मी महाराष्ट्र NEWS CHANNEL

## जिद्द आणि धैर्याला सलाम

राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यातील नियमित समन्वय, या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन, अखंड चारशे तासांचे प्रयत्न आणि ६५२ सरकारी कर्मचार्यांचे सहकार्य यामुळे सतरा दिवसांच्या या मोहिमेला यश आले आहे. आता खर्या अर्थाने या सगळ्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी साजरी होईल.

उत्तर काशीतील सिल्क्यारा येथे बांधल्या जात असलेल्या बोगद्यात गेल्या सतरा दिवसांपासून अडकलेल्या सर्वच्या सर्व ४१ मजुरांना बाहेर काढण्यात अखेर यश आले आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या जवानांनी परवा रात्री या मजुरांना बाहेर काढले तेव्हा त्यांच्या नातेवाईकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. तब्बल सतरा दिवस त्यांच्या सुटकेसाठी विविध पर्यायांचा वापर करीत युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू होते, त्याला यश आले आहे. प्रारंभी अमेरिकी ऑगर यंत्राच्या मदतीने खोदकाम करून त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाला. मात्र यंत्राची पाती खडकाळ भागाला अडकल्याने काही काळ काम बंद ठेवावे लागले. ऑगर यंत्रही सुटकेसाठी काही प्रमाणात निरूपयोगी ठरल्याने रॅटहोल मायनिंग तंत्राचा वापर करण्यात आला. रॅटहोल मायनिंग ही पद्धती खाणीतून कोळसा काढण्यासाठी वापरली जाते.अशास्त्रीय ही पद्धत असून, त्यामुळे अपघाताची शक्यता असल्याने त्यावर बंदी आहे. मात्र या मजुरांना वाचवण्यासाठी अखेर तिचाच वापर करावा लागला आहे. आंतरराष्ट्रीय बोगदे विषयातील तज्ज्ञ ऑर्नाल्ड डीक्स हेही बचाव पथकाला मार्गदर्शन करीत होते. जेव्हा असे बोगदे बांधले जातात तेव्हा तेव्हा त्यात सुटकेसाठी पर्यायी मार्ग असणे आवश्यक असते. काही देशात बोगदे बांधण्याच्या पहिल्या टप्प्यातच त्यातून सहजपणे बाहेर पडता येईल, असा पर्यायी (एक्सेप टनेल) बोगदा बांधला जातो. सिल्क्यारा बोगदा बांधताना हा पर्यायी बोगदा शेवटच्या टप्प्यात बांधला जाणार होता. या दुर्घटनेनंतर बोगद्याचा काही भाग कोसळण्याच्या कारणांचा शोध घेणेही आवश्यक आहे. अन्यथा या घटनेतून आपण काहीच शिकलो नाही, असे म्हणावे लागेल. हा अपघात कसा झाला या विषयीचे केवळ अंदाजच करता आले आहेत. सखोल चौकशीनंतर त्याची उत्तरे यथावकाश मिळू शकतील. काही जण ही दुर्घटना स्फोटामुळे झाल्याचे सांगतात, तर काही जण भूस्खलनामुळे ही दुर्घटना घडली असावी, असा अंदाज व्यक्त करतात. अशा प्रकल्पांना मंजुरी देताना नैसर्गिक परिस्थितीवर मात करण्याचे आव्हानही डोळ्यासमोर ठेवायला हवे. बोगदे, भुयारी मार्ग यांच्या बांधकामापूर्वी आवश्यक ती बचाव सामग्री, कामगारांशी संपर्क साधण्यायोग्य यंत्रणा, औषधोपचार आणि आणीबाणीची स्थिती हाताळू शकेल अशी यंत्रणा यांचे नियोजन आणि पूर्वतयारी असल्याखेरीज अशा बांधकामांना परवानगी नसावी. हे सर्व मजूर सतरा दिवस बोगद्यात अडकले होते. त्यांचे मनोबल टिकवण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर होते. मजुरांनीही जे धैर्य दाखवले त्याचे कौतुक करायला हवे आणि रात्रंदिवस जिद्दीने या संकटावर मात करणार्या बचाव पथकाचेही ! स्वतः पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री सातत्याने या मदतकार्याचा आढावा घेत होते. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वयामुळे बचाव मोहिमेला यश आले आणि सर्व मजुरांची सुटका झाली. बोगद्यात अडकलेले मजूर सुरक्षित असल्याचे समजल्याने त्यांच्या नातेवाईकांनाही मोठा दिलासा मिळाला होता. तरीही बचाव मोहिमेत वारंवार येणार्या अडथळ्यामुळे त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. एकाच वेळी पाच वेगवेगळ्या पातळीवर त्यांच्या सुटकेचे प्रयत्न सुरू होते. बोगद्यात अडकलेल्या मजुरांना वाचवण्याचे काम अवघड आणि आव्हानात्मक होते. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत ही मोहीम यशस्वी करण्यात आली. या मजुरांच्या सुटकेचा क्षण सर्वांच्या दृष्टीने भावुक होता.आत अडकलेले मजूर, त्यांचे सहकारी, त्यांना वाचवण्याचे प्रयत्न करणारी यंत्रणा यांचे धाडस सर्वांनाच प्रेरणा देणारे आहे. या मजुरांना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यात येत आहे. त्यांना प्रत्येकी एक लाखाचे अर्थसाहाय्य जाहीर झाले आहे. कोणतीही दुर्घटना किंवा आपत्ती एक नवा अनुभव आणि धडा शिकवत असते. विकासाच्या दृष्टीने असे प्रकल्प उभारणे ही गरज असली, तरी पर्यावरणाचा समतोल ढासळणार नाही, याचीही काळजी घेणे आवश्यक ठरते.

# ॥ गुटखा बंदी कागदावरच आहे काय. ? ॥

वर्तमानपत्र उघडल्यानंतर जशा आत्महत्येच्या बलात्काराच्या बातम्या येतात त्याचबरोबर आता गुटखा पकडल्याच्या किंवा धाड घालून गुटखा हस्तगत केल्याच्या बातम्या फार मोठ्या प्रमाणात वाचायला मिळतात. खूप मोठ्या रकमांचा गुटख्याचा साठा जप्त केला जातो. जप्त केल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली जाते असेही वाचतो. परंतु ती कारवाई काय असते ते समजत नाही. केवळ दंड करून सोडून दिल्यानंतर परत ते सत्र सुरू असते.

आता हेच बघा,नाशिक शहरात दोन लाखाचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. घोटी शिवारात ६३ लाख २४ हजार गुटखा जप्त केला. नाशिक येथील वडाळा गावातून साडेचार लाखाचा गुटखा जप्त केला. धुळ्याजवळ २८ लाखाचा गुटखा जप्त केला. डोंबिवलीत ९९ हजार गुटखा जप्त, वसई महामार्गावर १ कोटीचा गुटखा जप्त, अकोला जिल्ह्यात गुटख्याची अवैध साठवणूक, तेलारा, मलकापूरला १९ लाखाचा गुटखा जप्त. मध्यप्रदेश मधून बुलढाण्यात गुटख्याचा पुरवठा, साताराकडून पुण्याकडे निघालेला सत्तर लाखाचा गुटखा जप्त. अशाच प्रकारे जालना, छ.संभाजीनगर, पुणे, जळगाव, अमरावती, नागपूर,यवतमाळ अशा अनेक ठिकाणी गुटख्याचा साठा जप्त केला गेल्याच्या बातम्या वाचल्या असतील. दिल्लीहून सडकी सुपारी आणून अमरावती मध्ये गुटखा बनवला जातो अशीही बातमी वाचण्यात आली. अनेक निरनिराळ्या नावाने ब्रँड लावून विक्री होते. कोट्यवधीची उलाढाल होते, त्यात अन्न औषध प्रशासनाचाही हिस्सा म्हणून दिला जातो ही चर्चा आहे.

गावपातळीवर तालुक्याचे ठिकाणी खेडे वस्तीवर सुद्धा गुटखा विक्री सर्रास सुरू असते पण अशा ठिकाणी गुटखा पकडला आहे, कारवाई झाली आहे, असे शक्यतो वाचायला मिळत नाही. फक्त या मोठ्या बातम्या तेवढ्या दिसतात मात्र अशा प्रकारे जो गुटखा विक्री केला जातो त्याचे प्रमाण खूप असते. शालेय,महविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुणाई यांच्यात ते विभागले असते.

राज्यात गुटख्यावर बंदी असताना अशा प्रकारे अनेक ठिकाणी त्याचा मोठ्या प्रमाणात साठा जप्त केला जातो त्याची विक्री मात्र छुप्या मार्गाने सुरूच असते. काही ठिकाणी तर उघड उघडपणे गुटखा विक्री होत असते. अर्थात अशा प्रकारे पान टपऱ्यावर,किराणा दुकानात, चहाच्या टपरीवर, गुटखा, सुगंधी तंबाखू विक्री होत असल्याने तो सहजगत्या मिळू शकतो.बियरबार,दुधविक्री केंद्र, यातूनही गुटखा विक्री होत असल्याचे समोर आले




आहे.त्यांच्या पाठीशी बडी मंडळी असल्याने ते न घाबरता विक्री करत असतात. अन्न औषध प्रशासनाचे किती गंभीर पणे याकडे लक्ष आहे दिसून येते. दुर्लक्ष कले जाते.

शाळा कॉलेज परिसरात १०० मीटर पर्यंत( गुटखा पान तंबाखू सिगरेट आदी वस्तू विक्री केली जाऊ नये,) पान टपऱ्या नसाव्या असा आदेश महाराष्ट्र शासनाने काढला असूनही त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. आणि हेच महत्त्वाचे कारण असल्यामुळे शाळा कॉलेज परिसरात तो सहज पणे मिळतो. विद्यार्थी आणि तरुण पिढी या नशेपासून दूर राहण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठीच सरकार धोरण आखते.परंतु नुसते धोरण आखून उपयोग नाही. असे असंख्य धोरणे आणि कायदे केले जातात परंतु कडक अंमलबजावणी अभावी ते सर्व फोल ठरले आहेत.

प्रामुख्याने ही शासनाची जबाबदारी तर आहेच परंतु समाजाने, शिक्षण संस्थांनी, आणि स्वयंसेवी संस्थांनी, याबाबतीत पुढाकार घेणे आवश्यक आहे. परंतु शिक्षण संस्थाचालक याबाबतीत उदासीन असतात.. शाळेजवळ जरी टपरी असली तरी त्याला संस्था मनाई करत नाही. किंवा तक्रार करत नाही एखादा विचारी, मुलांच्या भवितव्याचा विचार करणारा मुख्याध्यापक तक्रार करतो त्याच्यावर हल्ले होतात जीवे मारण्याची सुपारी दिली जाते. नजीकच्या काळातच मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी त्यांनी टपरी हटवण्यासाठी तक्रार केली किंवा पुढाकार घेतला तेव्हा त्यांच्यावर प्राण घातक हल्ला झाला. मुख्यमंत्र्यांकडून त्यांची विचारपूस झाली. वैद्यकीय मदत देऊ केली. या गोष्टीचा विचार केला तर शासन- प्रशासनाने ही गंभीर बाब समजून त्याविषयी ताबडतोब काहीतरी कारवाई आणि कार्यवाही करायला हवी आहे. चांगल्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींवर असे हल्ले होऊ लागले तर मग त्यासाठी झगडूच नाही का? अशा शाळांच्या मुख्याध्यापकांना संरक्षण द्यायला हवे आहे अर्थात ते करतात ते विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच करतात. आपली युवा पिढी, शालेय विद्यार्थी व्यसनाधीन होऊ नये हाच त्यांचा उद्देश असतो.शाळा,महविद्यालयीन परिसरातील परिस्थितीचा शोध घ्यायला हवा.

कायदे केले जातात परंतु तेही कागदावरच असतात आणि विशेष म्हणजे अशा अमली पदार्थ किंवा गुटखा विक्री याला अनेक राजकीय नेत्यांचेही पाठबळ असते अशाही बातम्या आपण वाचल्या असतील. अनेक ठिकाणी दारूबंदी असतानाही नेतेच दारूबंदी होऊ नये याकरता प्रयत्नशील असतात. एकीकडे आपण म्हणतो की भारत हा तरुणांचा देश आहे एकूण लोकसंख्येपैकी ६०/६५ टक्के ३५-४० वयोगटातील तरुण या देशात आहेत.या तरुणाईच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत आणि अशा प्रकारे गुटखा आणि नशा आणणारे सुगंधीत सुपार्या जर तरुणांच्या हाती लागतील तर त्यांचे मन व्यसनाचे आहारी जायला वेळ लागत नाही. विद्यार्थीदशा ही पहिली पायरी आहे गुटखा ही सुरुवात आहे. ह्याच वेळी ते जर व्यसनाधीन झाले तर पुढे त्याचे प्रमाण वाढत जाते त्या दृष्टीने हा विचार होणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या काळात आपण बघितले आहे की कशी दारू विक्री होते. खाणे.. पिणे.गुटखा.. धुम्रपान.. यात युवक वर्ग कसा कसा व्यसनाधी होत जातो त्याच्या आहारी जातात .अनेक युवक व्यसनाधीन होतात. जीवनातून उठतात.व्यसनासाठी गुन्हेगारी कडेही वळतात.



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव.
मो.८९९९५६६९१७

सुपारी आणि तंबाखू यांच्या मिश्रणामध्ये सुवासिक द्रव्य घालून गुटखा बनवला जातो त्यात निकोटीन आणि अनेक घातक रसायने असतात, त्यामुळे पोट, तोंड, जीभ, घसा, अन्ननलीका याचा कर्करोग होऊ शकतो. गुटखा अतिशय अपायकारक असतो त्याच्या सेवनाने अनेकांना मृत्यू ओढवला आहे. त्याच्या सेवनाने कर्करोग होतो हे सिद्ध झाले आहे. फुफुसाचे आजार, हृदयविकार, सुद्धा यामुळे होतात .लाखो लोकं यामुळे मृत्युमुखी पडतात. कर्करोगाचे बरेचसे प्रकार हे तंबाखूशी निगडीत असल्याचे डॉक्टरी निदान आहे. त्यासाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करते, योजना राबवल्या जातात मोठे मोठे हॉस्पिटल्स उभारले जातात ते योग्यच आहे, परंतु त्याच्या मूळ कारणाकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते, कारण दारू, बियर, गुटखा, या साऱ्या गोष्टीतून सरकारला फार मोठा महसूल मिळतो आणि त्यामुळे हे दुर्लक्ष केले जाते म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.सिगारेट पिणे,दारु पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे टिप मारली की शासन प्रशासनाची जबाबदारी संपली... मग प्या आणि मरा..

मध्यंतरी अशी एक बातमी वाचण्यात आली होती, ती होती दारू आणि बियर चा खप कमी झाल्यामुळे चिंता व्यक्त केली होती, महसूल कमी झाला होता त्यासाठी महाराष्ट्र शासनाने एका अभ्यासगटाची स्थापन केली. अर्थातच दारू पिण्याचे प्रमाण कमी झाले ही चांगलीच गोष्ट आहे .परंतु त्याचे प्रमाण कमी का झाले हा काही संशोधनाचा विषय नाही, आणि त्याच्यावर समिती नेमणे हा ही एक विचित्र प्रकार वाटतो. भलेही व्यसन वाढले तर चालेल परंतु खजिन्यात येणारा महसूल कमी व्हायला नको हीच भावना दिसते.

राजकीय द्वंद्वात आणि आपापसातील मतभेदामुळे राजकारण गढूळ झाले आहे. त्यात जसे बेरोजगारी, महागाई, आणि त्याचबरोबर आता गुटखा मावा सुगंधी तंबाखू दारू याचे तस्करी कडे लक्ष दिले जात नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.

स्वामी विवेकानंद म्हणायचे युवा शब्दात वायू म्हणजे गती आहे. आणि त्या दृष्टीने या युवाशक्तीला विधायक वळण दिले पाहिजे. समाजाप्रती प्रेम, कणखर राष्ट्र भक्ती, आणि निर्विसनी युवापिढी तयार होणे आणि घडवणे हे सुद्धा शिक्षण संस्थेकडून अपेक्षित आहे. सामाजिक, राजकीय, आणि शैक्षणिक, या तिन्ही पातळीवर युवकांसाठी मोठे प्रयत्न होणे आवश्यक आहे नाहीतर गुटख्याची आणि अशा मादक द्रव्यांची तस्करी सुरू राहून,विद्यार्थी, युवक कमकुवत होईल. आताच बघितले तर अनेक युवक नैराश्याने ग्रासलेले आहेत त्यांना रोजगार नाही. त्यांची एकंदरीत जीवनाची दिशा बदलून जात आहे. सर्वच युवक व्यसनी आहेत असे नाही, परंतु ही गुटखा,मावा, सुगंधी सुपारी, तंबाखू, ची प्राथमिक अवस्था जी व्यसनाला टोकापर्यंत नेते ती सुरू राहिली तर आपला भारत देश व्यसनाधीनांचा देश म्हणून नक्कीच ओळखला जाईल. तेव्हा आताच देश महासत्ते कडे वाटचाल करीत असतांना सावधानता आवश्यक आहे. गुटखा तस्करी ,आणि विक्री करणाऱ्या वर कडक कारवाई आवश्यक आहे.

# काळ रात्र होता होता झाला उषःकाल...

संपूर्ण देश दिवाळीसारखा मोठा आणि आनंद द्विगुणित करणारा सण साजरा करीत असतानाच १२ नोव्हेंबरची पहाट, सूर्य नुकताच वर येत होता, हाडे गोठवणाऱ्या थंडीत उत्तरकाशीत कामगार बोगदा खणण्याचे काम करत होते. मात्र त्याचवेळी बोगद्याचा काही भाग कोसळला आणि अवाढव्य बोगदा निर्माण करणारे शिल्पकार त्यात अडकले. या कामगारांच्या सुटकेसाठी संपूर्ण देश आतुर झाला होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी उत्तराखंडमधील सिलक्यारा चारधाम यात्रेच्या मार्गावरील निर्माणाधीन बोगद्याचा काही भाग कोसळला आणि तब्बल ४१ मजूर बोगद्यात अडकून पडले व त्यांच्यासमोर अंधःकार पसरला. आपल्या देशबांधवांसाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या उत्तराखंडमधील चारधाम प्रकल्पाचा भाग असलेल्या सिलक्यारा ते बारकोट या पाच किलोमीटरच्या बोगद्याचे काम करण्यासाठी ते अहोरात्र मेहनत घेत होते. पण बांधकाममधीन असलेल्या या बोगद्याच्या सिलक्यारा दिशेकडील सुमारे ६० मीटरचा भाग अचानक खचल्याने ४१ कामगार अडकले. बोगद्याच्या बांधून तयार असलेल्या दोन किलोमीटर भागात हे कामगार अडकून पडले होते.


१२ नोव्हेंबरला पहाटे सिलक्यारा ते बारकोटदरम्यान बोगद्यात भूस्खलन झाल्याने त्यात मजूर आत अडकले. बोगद्यात २६० ते २६५ मीटर आत मातीच्या ढिगाऱ्यापलीकडे अडकलेल्या मजुरांना बाहेर काढणे उत्तराखंड सरकारसमोर एक मोठे आव्हान होते. केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व यंत्रणा मजुरांना बाहेर काढण्याच्या कामात गुंतल्या. बचावकार्यात भारतीय लष्कराची मदत घेण्यात आली. यासाठी इंजिनीअर रेजिमेंटचे ३० जवान घटनास्थळी उपस्थित होते. पाइपच्या माध्यमातून त्यांना प्राणवायू आणि खाद्यपदार्थ पाठवणे सुरू ठेवले होते. वॉकी-टॉकीच्या माध्यमातून मजुरांशी संपर्कही साधण्यात आला होता. बोगद्यात अडकलेले मजूर सिलक्याराच्या बाजूने आत गेले होते. ज्या बोगद्यात ते अडकले होते, त्यात हालचाल करण्यासाठी जवळपास दोन किलोमीटरचा भाग उपलब्ध होता. त्यामुळे मजुरांची घुसमट वगैरे झाली नाही. तसेच विजेचे दिवे असल्यामुळे वावरही सुलभ राहिला. मजुरांना वेळ घालवण्यासाठी आणि गुंतून राहण्यासाठी लुडो, पत्ते आणि बुद्धिबळ आदी खेळ बोगद्यात पाठवण्यात आले होते. मजुरांना तणावमुक्त ठेवण्यासाठी त्यांना योगासने करण्याचा सल्ला देण्यात आला होता. सरकारने मजुरांकडे मोबाइल फोनही पाठवले होते, जेणेकरून हे आपल्या कुटुंबीयांच्या संपर्कात राहू शकतील.

या ४१ कामगारांना तब्बल १७ दिवसांनी बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आले आहे. बोगद्यात दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ अडकलेल्या ४१ मजुरांची अखेर महत्प्रयासानंतर सुखरूप सुटका करण्यात आली. बचाव पथकांनी मंगळवारी या मजुरांना बोगद्यातून बाहेर काढले. विविध यंत्रणांचा सहभाग असलेल्या या बचावकार्याची रात्रीच्या सुमारास यशस्वी सांगता झाली. बोगद्यातील ढिगाऱ्यात खोदकाम करण्यासाठी ऑगर मशीन मागवण्यात आले होते; परंतु हे मशीन सातत्याने नादुरुस्त ठरत होते. अखेर हे मशीन निकामी झाले. त्यामुळे, यंत्राची मदत न घेता कामगारांमार्फत खोदकाम करण्याबरोबरच अन्य पर्यायांचा विचार सुरू झाला. मोहिमेच्या अंतिम टप्प्यात 'रॅट होल मायनिंग' तंत्राचा वापर करून मजुरांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. विज्ञानानेही हात टेकल्यानंतर ड्रिलिंग तज्ज्ञांनीही देवाचा धावा केला.

मजुरांना बाहेर काढण्यासाठी यंत्रणांना तब्बल ६० मीटरपर्यंत खोदकाम करावे लागले. या खोदकामासाठी अमेरिकेहून ऑगर मशीन मागवण्यात आली. तसेच दिल्लीतले तज्ज्ञ बोलावण्यात आले होते. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाहून बोगद्याच्या कामातले तज्ज्ञ अर्नाल्ड डिक्स यांनादेखील बोलावले होते. मजुरांची सुखरूप सुटका झाल्यानंतर अर्नाल्ड डिक्स यांचेही कौतुक होत आहे. कारण, मजुरांना बाहेर काढण्यात डिक्स यांचे देखील मोठे योगदान आहे. डिक्स यांनी हे मजूर नाताळपर्यंत बाहेर येतील. कोणालाही कसलीही दुखापत होणार नाही, असे ठामपणे सांगितले होते व ते त्यांनी खरे करून दाखविले. एक टीम म्हणून भारतातील यंत्रणा, त्यांचे अभियंते, कर्मचारी अहोरात्र झटत होते. गेल्या १७ दिवसांपासून हे मजूर बोगद्यात अडकले होते. त्यांनी सूर्याची किरणेही पाहिली नाहीत. पाइपद्वारे त्यांना जेवढे अन्न-धान्य, पाणी आणि ऑक्सिजन पुरवला जात होता, त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह होत होता. त्यामुळे त्यांच्या सुटकेसाठी अथक प्रयत्न सुरू होते आणि देशभरातून प्रार्थना केल्या जात होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांच्याशी फोनद्वारे सतत संपर्क ठेवला होता. या बचाव कार्यात व कामगारांच्या सुटकेसाठी देशभरातील विविध यंत्रणा उत्तराखंडमध्ये एकवटल्या होत्या. त्यात नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स, उत्तराखंड स्टेट डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स, बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन, नॅशनल हायवेज अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, इंडो-तिबेट बॉर्डर पोलीस, वेस्टर्न कोल फिल्ड लि.सह विविध एजन्सी सहभागी झाल्या होत्या.

बोगद्यात अडकलेल्या कामगारांच्या सुटकेनंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यासाठी बोगद्याबाहेरच जवळपास ४० रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आल्या होत्या. सर्व कामगारांची प्रकृती उत्तम आहे. कामगार बोगद्यात अडकल्यापासून सातत्याने त्यांच्या बचावासाठी प्रयत्न सुरू होते. कामगार बाहेर येताच स्थानिकांनी आणि अनेक ठिकाणी मिठाईचे वाटप करण्यात आले व जणू दिवाळीच साजरी झाली. अनेक यंत्रणांनी केलेले हे संघटित प्रयत्न आहेत.

## शब्दकोडे-२४७



**आडवे शब्द**

१. पूर्ण बंदोबस्त ४. पुष्कळ ७. नम्रतेने मान खाली घालणे ११. एक पालेभाजी व खाद्य तेल १३. उष्ण, कढत १५. गंध १६. ओरखडा १८. डाळीचे कालवण २०. सोने २२. खोदण्याचे काम २४. सीतापती २५. सोन्याचा कस २६. बागवान २७. सोन्याची कांब २९. पहिला ऋतू ३१. चित्रपटाचा हिरो ३२. मर्कट ३४. आराम --- है! ३५. कठीण (प्रसंग) ३६. भीती ३८. हे मीठ देखील अळणी असते ४०. छोटा लहान ४२. सरसकट ४६. नाश, नेस्तनाबूत ४७. मातापिता ५०. पाण्यातील फूल ५२. गाव, शहर ५३. मिजास, डौल ५५. एकाग्र नजर ५६. जास्तीत जास्त व कमीत कमी ६०. वय ६१. रविवासर ६२. शर्त, पण ६४. मंत्रीमंडळ ६६. देवाणघेवाण ६८. मोठ्या पानांची एक पालेभाजी ७०. मीठाची चव ७१. च्यासह, च्या बरोबर ७३. बारीक दगड ७४. श्रीरामाचे स्तोत्र ७७. हूल देणे म्हणजे अशी हाळी ८१. अंजन ८२. कारस्थानी ८३. नवरदेव ८४. गार, थंड ८५. अरण्य

**उभे शब्द**

१. किंचित कडू २. परशुरामाची भूमी ३. टिंगल ४. खराब ५. तपास, शोध ६. स्पष्ट, सडेतोड ८. तेव्हा (ग्रा.) ९. चर्चा १०. केर १२. कोवळी फांदी १४. अंतःकरण १७. नमस्काराची हाळी १९. मांडणी करणारा २१. चिवचिवाट २३. नूतन २६. मर्कट, कपि २८. डोंगरी किल्ला, डोंगर ३०. अनुमती ३३. संकटाची छाया ३४. दिलेली खात्री ३४अ. कडक, खरखरीत ३५. बाळाची गाडी नाव वडिलांचे! ३७. जीभ ३८. श्वासाचा अवयव ३९. महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ४१. अक्षराचा उच्चार बदलणारी चिन्हे ४३. वटवट, त्रास ४४. फक्त, केवळ ४५. दुधाच्या वड्या ४७. जळजळीत, अत्यंत तीव्र ४८. जन्म ४९. पर्वत ५१. दहावी रास ५४. युद्ध ५६. व्यायाम ५७. ठोक! हाण! ५८. गडकरी ५९. अफूचे बी ६२. अभिनेता ६३. हजार किलो ६५. भांड्याला पडलेला खड्डा ६६. कुस्तीची जागा ६७. नृत्यकलेची जागा ६९. लक्ष्मीचे एक नाव ७२. अखेर, शेवट ७३. दर्यावर्दी ७५. मळलेला ७६. धुणे (संस्कृत) ७८. खेडे ७९. अजगर ८०. रेष ८१. आजच्या आधीचा दिवस

**शब्दकोडे-२४६ चे उत्तर**

**आडवे उत्तर**

१.ढाल तलवार ४.नकलाकार ७.चाक ९.पेशा १०.सासर १२.रमा १३.गडगडाट १६.रुबाबदार १८.वाटचाल १९.जर २१.जड २२.खेळ २३.पोवाडा २५.तास २७.बळकट ३०.ओ ३१.टकटक ३२.रगड ३३.तारवटणे ३६.गीताई ३९.टक ४०.फसगत ४२.तर ४३.वातहारक ४५.माळ ४७.कानस ४९.काळ ५०.तडकाफडकी ५२.सामनावीर ५३.कनात ५४.आब ५५.अवयव ५६.पडसाद ५८.विडा उचलणे ६१.यातना ६३.वारा ६४.सरदार ६६.रुकार ६८.मालक ७०.नवलकोल ७४.रद्दड ७६.वर्ण ७७.तार ७८.कलाकार ७९.बाधणे

**उभे उत्तर**

१.ढालगज २.तरंग ३.वाईट ४.नशाबाज ५.कासार ६.रस ७.चारचाकी ८.कमाल ९.पेरु ११.रवाळ १४.डरपोक १५.डाकोडाक १७.बडबडगीत २०.माता २२.खेटर २४.वाटण २६.सरबत २८.कताई २९.पोट ३१.टवटवीत ३४.वसंत ३५.डोस ३७.तारकानाथ ३८.नकळत ४०.फळफळावळ ४१.गळकी ४३.वासर ४४.रकाना ४५.माका ४६.कसाबसा ४८.नवी ५१.डरावडराव ५३.कवच ५४.आड ५६.पदर ५७.दया ५८.विनाकरण ५९.उभा ६०.लवलवणे ६२.तरु ६३.वानर ६४.सल ६५.दादला ६७.रद्द ६९.कर्ण ७१.लता ७२.कोर ७३.सूर ७५.डबा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### रेल्वे प्रवाशांवर चाकूहल्ला; संशयित ताब्यात

**नाशिक ।** रेल्वे प्रवाशांवर चाकूने हल्ला करून जखमी केल्याप्रकरणी चार संशयितांना नाशिक रोड रेल्वे पोलिसांनी मालेगाव येथून ताब्यात घेतले. सीटवर बसण्यावरून वाद घालत या चौघांनी हा गुन्हा केला. प्रभारी पोलिस निरीक्षक महेश कुलकर्णी, सहाय्यक निरीक्षक बालाजी शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संतोष उफाडे-पाटील, विजय कपिले, शैलेश पाटील, आरपीएफचे मनीष कुमार, दीपक सानप आदींनी ही कामगिरी केली. रेल्वेमार्ग पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील, अधिकारी मारुती पंडित यांनी पथकाचे कौतुक केले. महफूज रईस आलम (वय ३४, रा. आगारा, उत्तर प्रदेश) हा युवक मंगला एक्स्प्रेसने आग्रा ते कल्याण प्रवास करीत होता. मनमाड येथून बसलेल्या चार युवकांनी मनमाड ते नाशिक रोडदरम्यान महफूज आलमशी जागेवर बसण्यावरून वाद घातला. त्याचा मोबाईल हिसकावला. महफूजने विरोध केला असता त्याच्यावर चाकूने हल्ला केला.

# अखेर कार्यारंभ आदेश निघाले; शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनच्या प्रयत्नांना यश

## गोविंदनगर जॉगिंग ट्रॅक, गॅबियन वॉल, बॉक्स कल्व्हर्टचे काम लवकरच सुरू होणार

**नाशिक । प्रतिनिधी**

गोविंदनगर येथील जॉगिंग ट्रॅकचे नूतनीकरण, नंदिनी नदीवर गॅबियन वॉल बांधणे आणि कोठावळे मळ्यात बॉक्स कल्व्हर्ट बांधणे या कामांची वर्कऑर्डर काढण्यात आली आहे. आर्थिक तरतूद धरण्यापासून अंतिम मंजुरी मिळेपर्यंत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने केलेल्या सतत दोन वर्षांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. महापालिका प्रशासनाचे प्रभागातील नागरिकांच्या वतीने आभार मानण्यात आले आहे.



गोविंदनगर जॉगिंग ट्रॅकचे नूतनीकरण व नंदिनी नदीवर गॅबियन वॉल बांधण्यासाठी आर्थिक तरतूद करावी, यासाठी सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या पुढाकाराने १३ डिसेंबर २०२१ रोजी निवेदन देण्यात आले. तत्कालीन महापालिका आयुक्त कैलास जाधव यांनी ८ फेब्रुवारी २०२२ च्या अर्थसंकल्पात गॅबियन वॉलसाठी १ कोटी ६४ लाख ९० हजार रुपयांची, तर जॉगिंग ट्रॅकसाठी ७५ लाखांची तरतूद केली. बदललेली दर सूची व जीएसटीसह २०२३-२४च्या अर्थसंकल्पात याच गॅबियन वॉलसाठी वाढीव रक्कमेसह १ कोटी ९७ लाखांची तरतूद धरण्यात आली आहे. बडदेनगर, पाटीलनगर १८ मीटर रस्त्यालगत कोठावळे मळ्यात नाल्यावर बॉक्स कल्व्हर्टसाठी दोन कोटींची तरतूद प्रशासनाने केली होती. शेवटी नंदिनी नदीत आंदोलन करण्याचे निवेदन दिल्यानंतर या निविदा उघडण्यात आल्या. यानंतर अंतिम प्रशासकीय मंजुरी मिळविण्यासाठी, तसेच वर्क ऑर्डर काढण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात आला.

गॅबियन वॉल आणि बॉक्स कल्व्हर्टच्या कामांची वर्क ऑर्डर २० नोव्हेंबर आणि गोविंदनगर जॉगिंग ट्रॅकची २९ नोव्हेंबर २०२३ रोजी काढण्यात आल्याने ही कामे सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगिता देशमुख, भारती देशमुख, प्रभाकर खैरनार, विनोद पोळ, रवींद्र सोनजे, मनोज वाणी, सतिश मणिआर, नीलेश ठाकूर, यशवंत जाधव, डॉ. शशीकांत मोरे, बाळासाहेब राऊतराय, अनंत संगमनेरकर, बन्सीलाल पाटील, अशोक पाटील, संध्या छाया ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विठ्ठलराव देवरे, गोविंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भालचंद्र रत्नपारखी, बाळासाहेब देशमुख, बापूराव पाटील, बाळासाहेब तिडके, फकिरराव तिडके, डॉ. प्रतापराव कोठावळे, संतोष कोठावळे आदींसह रहिवाशांनी महापालिकेचे आभार मानले आहे.

# भुजबळ गो बॅक घोषणा देत कोटमगाव येथे मराठा समाजाने भुजबळांना घेरले



**लासलगाव । वार्ताहर**

येवला लासलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा ओबीसी नेते छगन भुजबळ नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आज येवला लासलगाव मतदारसंघात आले असता त्यांच्याच मतदारसंघात या दौऱ्याला मराठा समाजाने तीव्र विरोध दर्शवला आहे.

लासलगाव जवळील कोमटगाव रेल्वे पुलाजवळ मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत ना छगन भुजबळ यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी केली.'छगन भुजबळ गो बॅक',असं मराठा आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली तसेच काही कार्यकर्त्यांनी अर्धनग्न अवस्थेत ना भुजबळ यांच्या दौऱ्याला विरोध केला.या वेळी पोलिसांनी कडे तयार करून मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना आवर घातला.या वेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमप यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलिस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ निलेश पालवे यांच्यासह लासलगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल वाघ तसेच दंगा नियंत्रण पथकाच्या तीन गाड्या,दहा ते बारा पोलिस पथकाच्या मोठ्या गाड्या मधून प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

या वेळी परिस्थिती बघता ना छगन भुजबळ हे कोटमगाव येथे न थांबता मोठ्या पोलिस बंदोबस्तात सरळ वनसगाव व थेटाळे येथे नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी गेले मात्र त्याठिकाणी सुध्दा ना छगन भुजबळ यांच्या ताफ्याला मराठा आंदोलकांनी काळे झेंडे दाखवत गावात प्रवेश नाकारला.या नंतर ना भुजबळ यांनी याठिकाणी सुध्दा नुकसानग्रस्त भागाची पाहणी न करता हा दौरा अर्धवट सोडून सरळ नाशिकच्या दिशेने रवाना झाले

या वेळी मराठा समाजाचे डॉ सुजित गुंजाळ, ललित दरेकर, शिवा पाटील सुरासे, रवी होळकर, प्रमोद पाटील प्रमोद पवार, प्रवीण कदम, संतोष पानगव्हाणे, अनिरुद्ध होळकर, विकास रायते, तुकाराम गांगुर्डे यांच्यासह असंख्य मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आर. सी. पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत हॅकाथॉन स्पर्धा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट शिरपूर येथे नुकतीच हॅकाथॉन ४.० (एआय आणि मेटॅव्हर्से आधारित ऍप्लिकेशन्स) या स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या हस्ते व एम.सी.ए. विभाग प्रमुख प्रा. मनोज बेहेरे, पदवी विभाग प्रमुख डॉ. तुषार पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी सहभागी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रेझेंटेशनची प्रशंसा केली आणि या स्पर्धेत परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी आय.एम.आर. डी. टेक क्लबचे भव्य उद्घाटन देखील केले. परीक्षक म्हणून प्रा.व्ही.एम.पाटील उपस्थित होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे वैयक्तिकरित्या सादर केलेले प्रेझेंटेशन चे मूल्यमापन केले आणि त्यामधून पहिल्या उत्कृष्ट तीन संघांची निवड केली. हॅकाथॉन ४.० चे प्राथमिक उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता वाढवणे, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास वाढवणे आणि त्यांना जागतिक दृष्टीकोन व आधुनिक ए.आय. तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रामधील तंत्रज्ञानाशी अवगत करून देणे हे होते.

# राष्ट्रीय निवृत्ती योजनेबाबत एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन

**धुळे ।** जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांच्यासाठी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने बाबत मुंबई येथील अधिकाऱ्यांमार्फत सोमवार, दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हा प्रशिक्षण व शिक्षण संस्था,धुळे येथे सकाळी ११.१५ वाजता एक दिवशीय प्रशिक्षण घेण्यात येणार असल्याचे जिल्हा कोषागार अधिकारी प्र.सि.पंडीत यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

निवृत्तीवेतन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण व राज्य अभिलेख व देखभाल अभिकरण यांच्या सुचनेनुसार हे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचे सविस्तर वेळापत्रक सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना ईमेल संदेशाद्वारे पाठविण्यात आले आहे. तरी या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी किंवा प्रतिनिधींनी उपस्थित रहावे, असे आवाहनही श्री. पंडीत यांनी केले आहे.

# जागतिक अपंग दिनानिमित्त दिव्यांग गुणवंतांना समाजरत्न पुरस्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी दिव्यांग विकास आघाडी व न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था तसेच रामलीला एज्युकेशन सोसायटीच्या वतीने येत्या ३ डिसेंबर रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त दिव्यांग बांधवांना ब्लँकेट वाटप व सर्व क्षेत्रातील दिव्य़ग समाज बांधवांचा समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

शासकीय अधिकारी विलास दंडगव्हाळ, बबलु मिर्झा, सुनील निकम, पत्रकार वसंतराव गायकवाड, शिक्षण अधिकारी अंजली प्रधान यांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार शहर, भाजप शहर अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत वसंत स्मृती, भाजपा कार्यालय एनडी पटेल रोड नाशिक येथे कार्यक्रम होणार आहे. यावेळी आ. देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, विजय साने यांच्यासह सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. सर्व दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक बाळासाहेब घुगे, विनायक कस्तुरे यांनी केले आहे.

# लासलगाव रेल्वे उड्डाणपूल असून अडचण नसून खोळंबा

**नाशिक ।** मनमाड रेल्वे रुळावरील ऐतिहासिक व पुरातन पूल कोसळल्याने मनमाड मार्गे इतरत्र जाणारी वाहने लासलगाव मार्गे जात असल्याने लासलगाव मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर रहदारी वाढून लासलगाव करांना तासोनतास चक्का जामचा सामना करावा लागत आहे.अपूर्ण बाह्य वळण रस्त्या अभावी पुर्ण झालेला लासलगाव रेल्वे उड्डाणपूल असून अडचण नसून खोळंबा ठरत असल्याने लासलगावकर तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

लासलगाव ही परिसरातील चाळीस ते पन्नास खेडेगावांची बाजारपेठ आहे.तसेच लासलगाव मध्ये असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव रेल्वे स्थानक, लासलगाव बस आगार, लासलगाव बस स्थानक, भाभा अणू संशोधन केंद्र, वखार महामंडळाचे गोदाम, राष्ट्रीय बागवाणी संघ, लासलगाव पोलीस ठाणे, वेफको, नाफेड, लासलगाव ग्रामीण रुग्णालय, दोन महाविद्यालयं यामुळे लासलगाव



मध्ये मोठ्या प्रमाणात रहदारी वाढलेली आहे. वाढलेल्या रहदारीच्या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक वर्षांपूर्वी येथे उड्डाणपूल उभारण्यात आलेला आहे.या उड्डाणपूलास जोडणारा बाह्य वळण रस्ता देखील सुमारे ८० टक्के पुर्ण झालेला आहे. किरकोळ बाकी राहिलेल्या बाह्य वळण रस्त्याच्या कामामुळे लासलगावकरांना नित्यानेच चक्काजामचा सामना करावा लागतो.त्यातच आता मनमाडचा पूल कोसळल्याने मनमाड वरुन मालेगाव, इंदोर,देवळा, कर्नाटक कडे जाणारी अवजड वाहने मोठ्या प्रमाणावर येवला विंचूर लासलगाव मार्गे चांदवड कडे जात आहे.

## प्रांतधिकाऱ्यांच्या बनावट आदेशाने फसवेगीरी

**धुळे ।** निफाडच्या प्रांत हेमांगी पाटील यांचा बनावट आदेश तयार करून तो बस आगाराच्या सुरक्षारक्षक दाखवून डंपर नेल्याप्रकरणी लासलगाव पोलिसांत राजू चिंतामण ढोकळ (रा. सिन्नर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. विंचूरच्या मंडलाधिकाऱ्यांनी पकडलेला मुरूमने भरलेला डंपर (एमएच ०४, सीडब्ल्यू ४९९२) लासलगाव बस आगारात उभा केला होता. विंचूरचे मंडलाधिकारी संतोष डुंबरे यांना ४ जुलैला हा डंपर अवैध मुरूमची वाहतूक करताना आढळला. तो जप्त करून लासलगाव बस आगारात उभा केला होता. राजू ढोकळ यांनी निफाडच्या प्रांतांचा खोटा आदेश तयार केला. तो आदेश सुरक्षारक्षकास दाखवून डंपर फसवेगिरी करून घेऊन गेला. याबाबत मंडलाधिकारी डुंबरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजू ढोकळ याच्याविरुद्ध लासलगाव पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, पोलिस उपनिरिक्षक मोकळ तपास करीत आहेत.

# मनपाच्या भूखंडावर बांधलेल्या भिंतींना लोखंडी दरवाजे बसवावेत

## आम आदमी पार्टीची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टी नाशिकच्या वतीने प्रभाग क्रमांक १३ मध्ये बडी दर्गा शरीफ येथे पाण्याच्या टाकीजवळ मनपाचा भूखंड असून येथे मनपाने सदर भूखंडाला तटस्थ भिंत बांधून दिलेली आहे. परंतु या भूखंडात आजूबाजूचे रहिवाशी सतत कचरा टाकत असतात त्यामुळे समोर असलेल्या सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान हजरत सय्यद सादिक शाह हुसेन यांची दर्गा आहे. जिथे राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येतात. तसेच सदर मनपाच्या भूखंडाला लागून मनपाची शाळा देखील आहे. या भूखंडावर नेहमी दुर्गंध पसरलेला असतो, त्यामुळे मच्छर व माशांचे साम्राज्य खूप मोठ्या प्रमाणात झाले आहे.



महापालिकेच्या नाशिक मधील सर्वच भूखंडावर नुसत्या भिंती बांधल्या आहेत, परंतु त्यांना लोखंडी दरवाजे नसल्यामुळे नशा करणारे लोक, गार्डनमध्ये जावून नशा करीत असतात आणि सर्वत्र घाण पसरवीत असतात. याविषयी अनेक वेळा मनपाच्या अधिकाऱ्यांना वारंवार निवेदन देवूनही तेथील भूखंडाची साफसफाई झालेली नाही. तसेच सदर भिंतींना लोखंडी दरवाजे बसून देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली होती आणि आजही ती पूर्ण झालेली नाही.

पुन्हा मनपा आयुक्त अशोक करंजकर यांना स्मरणपत्र देवून मागणी करण्यात आली आहे. सदर भूखंड आठ दिवसाच्या आत स्वच्छ करून तेथे लोखंडी दरवाजे बसविण्यात यावे अन्यथा आम आदमी पार्टीच्या वतीने नाशिक मनपावर आंदोलन करण्यात येईल. आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी ही महापालिका प्रशासनाची असेल असे आपने निवेदनात म्हटले आहे. यावेळी राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मिडिया प्रमूख चंदन पवार, आंदोलन प्रमुख माजिद पठान, अमर गांगुर्डे आदी उपस्थित होते.

प्रोसेस जमा | ॲड.अजय के.वानखेडे, धुळे नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर.) सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं १३७२/२०२३

परेश सोमनाथ शिरूडे वगैरे ५ ... **अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ......**जाबदेणार**

कै. इंदुबाई सोमनाथ शिरूडे उर्फ वाणी मृत्यु दिनांक. १९/०८/२०१७
रा. ग.नं.३, राम मंदीर, चौक, कुसुंबा ता.जि.धुळे ... **मयत**

अर्ज- वारस दाखला मिळणेसाठी

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ५ यांनी शासकिय व निमशासकिय योजनांसाठी मयत कै. इंदुबाई सोमनाथ शिरूडे उर्फ वाणी यांचे कायदेशिर वारस आहेत याबाबत वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणची ही काही तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदरचे अर्जाचे चौकशीचे कामी उपरोक्त न्यालयात दिनांक ११/०१/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत धुळे येथिल मे. सिव्हिल जज्ज (ज्यु.डी.)सो. यांचे कोर्टात, कोर्ट नं. ४ सो. येथे हजर रहावे व आपले म्हणणे, तक्रारी व लेखी हरकत सादर करावी.अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरकामी चौकशी होवुन योग्य तो हुकूम होवुन अर्जदाराचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.२८/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**सिव्हिल जज्ज (सि.डी)कोर्ट, धुळे** **सिव्हिल जज्ज (सि.डी)कोर्ट, धुळे**

प्रोसेस जमा | ॲड.योगेश शिवाजी अल्हाट, धुळे नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं. १३८०/२०२३

श्रीमती निम्बाबाई तुळशीराम ठाकूर वै. ... **अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही**

कै. लोटन तुळशीराम ठाकूर (मयत) ...**जाबदेणार**

ज्याअर्थी की, कै. लोटन तुळशीराम ठाकूर हे अर्जदार नं. १ चा मुलगा असुन अर्जदार नं. २ यांचे पती असुन तर अर्जदार नं. ३ ते ६ यांचे वडील असुन ते दि. २५/०७/२०२३ रोजी मौजे नथ्थु बाबा नगर, मोहाडी उपनगर, धुळे येथे निधन झालेले आहे. येथे निधन/मयत झालेले आहे. कै. लोटन तुळशीराम ठाकूर यांच्या मृत्यु नंतर तिचे वारस म्हणुन अर्जदार व जाबदेणार यांची नावे महसुल दप्तरी नमुद होणेकामी वारस तक्ताची गरज आहे व इतर ठिकाणी ही वारस दाखल्याची नितांत गरज व आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. २९/१/२४ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

स्थळ - धुळे
दिनांक -

आदेशावरून

**व.लि** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे** **दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

# नाशकातील दुकानांच्या इंग्रजी पाट्यांना काळे फासत मनसेचे आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशकातील विविध प्रकारच्या व्यावसायिकांच्या तसेच दुकानांच्या इंग्रजी पाट्यांना काळे फासत मनसेने काल जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलन केले. राज्य सरकारच्या आदेशाप्रमाणे मराठीमध्ये पाट्या लावणे अनिवार्य असतांनाही नियमांची पायमल्ली करणाऱ्या व्यावसायिकांना मनसेतर्फे वेळोवेळी इशाराही देण्यात आला होता.







या आंदोलनप्रसंगी मनसेचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी महापौर अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष पराग शिंत्रे, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, मनसे कामगार सेना प्रदेश उपाध्यक्ष सलीम मामा शेख, महिला सेना प्रदेश उपाध्यक्ष सुजाताई डेरे, मनोज घोडके, नामदेव पाटील, अमित गांगुर्डे, संजय देवरे, मिलिंद कांबळे, उपशहराध्यक्ष सचिन सिन्हा, संतोष कोरडे, विजय आहेरे, अक्षय खांडरे, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, भाऊसाहेब निमसे, साहेबराव खर्जुल, धीरज भोसले, बंटी लबडे, नितीन माळी, प्रमोद साखरे, अर्जुन वेताळ, निकितेश धाकराव, निलेश शहाणे, देवचंद केदारे, विजय ठाकरे, निखिल सरपोदार, राकेश परदेशी, किरण सिरसागर, ज्ञानेश्वर बगडे, महिला सेना जिल्हाध्यक्ष ज्योती शिंदे, शहराध्यक्ष आरती खिराडकर, अरुणा पाटील, स्वागता उपासने, अक्षरा घोडके, मीरा आवारे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष कौशल पाटील, शहराध्यक्षा ललित वाघ, विद्यार्थी सेना उपशहर अध्यक्ष रोहन जगताप, जनहित विधी जिल्हाध्यक्ष प्रफुल बनबैरू, शहराध्यक्ष सौरभ खैरनार, नितीन पंडित, शाम गोहाड, संदेश जगताप, शंकर कनकुसे, मनोज सोनवणे, गणेश जोमान, विशाल भावले, गोकुळ नागरे, भूषण शिरसाट, सचिन रोजेकर, मनोज सावंत, रोंनी पवार, अजिंक्य पारक, नितीन अहिरराव, अमोल निसळ, योगेश दाभाडे, साई गुंजाळ, किरण पवार, संदिप मालोकर यांच्यासह महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्य सरकारच्या आदेशाप्रमाणे मराठीमध्ये पाट्या लावणे अनिवार्य असतांनाही नियमांची पायमल्ली करणाऱ्या व्यावसायिकांना मनसेतर्फे वेळोवेळी इशाराही देण्यात आला होता.

CMYK



## न्यूज कॉलम

### बेशिस्त वाहनचालकांना पोलिसांचा दणका

**नाशिक ।** रोमिओगिरी करणाऱ्या टवाळखोरांविरोधात शहर पोलिसांनी धडक कारवाई केल्यानंतर, पोलिसांनी आपला मोर्चा कर्णकर्कश हॉर्न वाजवून रॅश ड्रायव्हिंग करणारे, ट्रिपलसीटसह वाहतूक नियमांचे सर्रासपणे उल्लंघन करणाऱ्या सुमारे सव्वा तीनशे वाहनचालकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी पदभार घेतल्यापासून शहर पोलीस क्शन मोडमध्ये आले असून, टवाळखोरांपाठोपाठ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई केली आहे. यामुळे टवाळखोर, रोडरोमिओ आणि वाहतूक नियमांचे सर्रासपणे उल्लंघन करणार्या वाहनचालकांचे धाबे दणाणले आहे.

### एस.व्ही.के. एम. ला बास्केटबॉल स्पर्धेत विजेतेपद

**धुळे ।** येथील एस.व्ही. के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले. महाविद्यालयातील मुलींच्या बास्केटबॉल संघाने विजेतेपद पटकावले. संघातील देवयानी जाधव, सानिका झेंडे, श्रीलेखा नांबियार, घोशिता पाटील यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संघाला विजय मिळवून दिला. वैभव महाले, ध्रुव नगराळे, फरहान शेख, सागर पाटील, कुणाल वाणी या मुलांच्या बास्केटबॉल संघास उपविजेतेपद मिळाले. समन्वयक प्रा. मनोज सोनार यांचे मार्गदर्शन मिळाले.

### कापणी करून पडलेल्या २७ हेक्टर भाताचे नुकसान

**नाशिक ।** काढणी करून शेतात पडलेल्या भात पिकाचे अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. एकूण २७ हेक्टरवरील पिकांच्या नुकसानीचा अंदाज असून, महसूल, कृषी विभाग व ग्रामसेवकांनी संयुक्तरीत्या पंचनामे सुरू केले आहेत, अशी माहिती तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी दिली. भरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार आहे, असे आमदार माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. पावसामुळे प्रामुख्याने शेतमालाचे नुकसान झाले आहे.

# महामार्गावर अपघात टाळण्यासाठी अंडरपास करा

### ग्रामस्थांचे जिल्हाधिकारींना निवेदन

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे-चाळीसगांव महामार्गावरील तरवाडे (ता. धुळे) येथे अंडरपास करावा, अशी मागणी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांनी केली. तरवाडे ग्रामस्थांच्या वतीने धुळे जिल्हाधिकारी अभिनय गोयल यांना याबाबत निवेदन देण्यात आले. या महामार्गावरील संभाव्य अपघात टाळण्यासाठी तरवाडे येथे अंडरपास होणे गरजेचा असुन तशी मागणी यापुर्वीही वेळोवेळी करण्यात आली आहे.

धुळे चाळीसगाव राष्ट्रीय महार्गावरील तरवाडे हे पाच हजारांवर लोकसंख्या असलेले मोठे गाव आहे. तरवाडे या गावाची लोकवस्ती ही एनएच २११ या राष्ट्रीय महामार्गाचा दोन्ही बाजूस आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या एका बाजूस जि.प.मराठी शाळा, माध्यमिक शाळा, रेशन दुकान, आदी सर्व प्रकारच्या रोजच्या दैनंदिन बाबी असुन दुसर्या बाजूस वस्ती आहे. यामुळे ग्रामस्थांना वेळोवेळी राष्ट्रीय महामार्ग ओलांडावा लागतो. म्हणून अंडरपास होणे हे ग्रामस्थाचा हितासाठी महत्वाचे आहे. येथील ग्रामस्थांच्या हितासाठी व वाहनांचे होणारे अपघात टाळण्यासाठी गावकर्यांनी ग्रामपंचायत कार्यालयामार्फत दि.९ नोव्हेंबर २०११ रोजी अंडरपासची मागणी केली होती. तरवाडे येथे उड्डाणपूल, अंडरपास अथवा बायपास करण्याच्या मागणीचे निवेदन तत्कालीन धुळे जिल्हाधिकारींकडे दिले गेले होते.

याविषयी वेळोवेळी पाठपुरावाही करण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. यानंतर दि.३ नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्या कार्यालयामार्फत तत्कालीन जिल्हाधिकारींच्या उपस्थितीत रस्त्याची पाहणी केली गेली. ह्या पाहणी दरम्यान तरवाडे गावाचे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी गावासाठी आवश्यक असणार्या अंडरपास विषयी सर्व गोष्टी विस्तृतपणे नमूद केल्या. यास आपल्या कडून सकारात्मक प्रतिसादही मिळाला व अंडरपासची मागणी मान्य करण्यात आली.

निवैदनात पुढे म्हटले आहे की, तरवाडे गावास अंडरपासची गरज आहे. वरिष्ठ स्तरावर कळवून अंडरपासची तरतूद करू, असे आश्र्वासनही यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाने गावकर्यांना दिले आहे. परंतु आजपर्यंत याबाबत काय झाले याबाबत कुठल्याही गोष्टीचा खुलासा झाला नाही. या महामार्गाचे काम गतीने सुरु असुन तरवाडे येथील अंडरपासचा विषय अतिशय गांभीयनि घ्यावा व येथे अंडरपासची सोय करावी अशी मागणी यावेळी निवेदनाव्दारे करण्यात आली. यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, धुळे पं.स. उपसभापती देवेंद्र माळी, सुनिल जमादार, गंगाधर चव्हाण, सागर माळी, समाधान माळी, विशाल माळी, लोकेश माळी, विवेक माळी, रोहित माळी, विनोद माळी, हर्षल वाघ, राज चव्हाण, विलास राठोड, कृष्णा माळी, योगिराज वाघ, अजय माळी, प्रविण माळी यांच्यासह तरवाडे ग्रामस्थ होते.

### जागतिक एड्स दिनानिमित्त धुळ्यात आज प्रभात फेरी



**धुळे ।** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग धुळे यांच्यातर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त एक डिसेंबरला धुळे शहरात प्रभात फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. येथील जिल्हा रुग्णालयाच्या आवारातून सकाळी आठला प्रभात फेरी काढण्यात येईल. जिल्हाधिकारी अभिनव गोयल अध्यक्षस्थानी असतील. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता प्रमुख पाहुणे असतील. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शितल पाटील, पर्यवेक्षक विलास पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. सकाळी आठला जिल्हा रुग्णालयाचे आवारातून महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थ्यांची प्रभात फेरी निघेल. तेथून साक्री रोड, गुरु शिष्य स्मारक, संतोषी माता चौक पुन्हा जिल्हा रुग्णालयात प्रभात फेरीचा समारोप होईल. शहरासह जिल्ह्यातील आयसीटीसी केंद्रातर्फे विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. प्रभात फेरीसह अन्य कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. देगावकर यांनी केले.



## बोराडी येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

### योजनांची माहिती देऊन केली जनजागृती

**धुळे । प्रतिनिधी**

पंचायत समिती, शिरपूर व ग्रामपंचायत, बोराडी यांच्या संयुक्त विद्यमाने बोराडी ता. शिरपूर येथे आज विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न झाली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गणेश मोरे, गटविकास अधिकारी एस.टी.सोनवणे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तालुक्यातील विविध गावांचे सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंपर्यंत केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पोहोचावा म्हणून केंद्र शासनातर्फे विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून ग्रामस्थांना शासनाच्या कृषी, आरोग्य, शेतकरी, महिला, युवा यांच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झारखंड येथे झालेल्या प्रधानमंत्री महिला किसान ड्रोन केंद्र व जन औषध केंद्राचे लोकार्पण कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण ग्रामस्थांना दाखविण्यात आले. यावेळी ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कुसूंब्यात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**धुळे । प्रतिनिधी**



कुसूंबा येथील एम.के. शिंदे विद्यालय आणि महाविद्यालयातील इ.१०वीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थीनींनी तब्बल ३० वर्षांनी एकत्र येत शालेय जीवनातील स्मृतींना उजाळा देत स्नेह मेळाव्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कुसूंबा ता.धुळे येथील एम.के.शिंदे विद्यालय व महाविद्यालयात सन १९९४ मध्ये इ.१० वीतील तुकडी अ आणि ब मधील माजी विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचा नुकताच स्नेह मेळावा पार पडला.मेळाव्यात शालेय जीवनातील उजाळा देण्यात आला. शिक्षण,अनुभव आणि वयाने थोर झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील लहानपणाचे सुवर्ण क्षण अनुभवले. यावेळी ठाणे जि.प.शाळेतील प्राथमिक शिक्षक राहूल परदेशी यांना एज्यूकेशन या नवी दिल्ली येथील संस्थेच्यावतीने नोबेल टीचर अवार्ड जाहिर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. दरम्यान यापुढेही नेहमी स्नेहमेळाव्याचे आयोजन करुन विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमात विकास पाटील, जयवंत सोनवणे, राजेश शिरुडे, किरण शिरुडे,योगेश शिंदे, भानुदास(बंटी) बैरागी, राहूल परदेशी, भगवान परदेशी, सुरेश परदेशी, जयश्री शिंदे, डॉ.युतिका भदाणे, नंदा महाले, प्रमोदिनी शिंदे, हर्षा पाटील आदी माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात सहभागी झाले होते.

### नवउद्योजकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**धुळे ।** औद्योगिक धोरण २०१९ अंतर्गत नवउद्योजक आणि नाविण्यपूर्ण स्टार्टअप्सना आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करुन नवउद्योजकांना पुरक वातावरण निर्माण करण्यासाठी शुक्रवार, १ डिसेंबर, २०२३ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व स्टार्टअप्स व इनक्युबेटर्स, महाविद्यालयातील शिक्षण घेत असलेले व नुकतेच उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, जिल्ह्यातील युवा वर्ग, नवउद्योजक, स्थानिक उद्योजक, उद्योग करु इच्छित असलेले व्यक्ती यांनी उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी केले आहे.

## सामोडे येथील युवा कार्यकर्ते वसंतराव घरटे यांना आदिवासी सेवक पुरस्कार

**सामोडे । प्रतिनिधी**



सामोडे येथील युवा कार्यकर्ते वसंतराव घरटे यांना महाराष्ट्र शासनातर्फे आदिवासी सेवक पुरस्कार घोषित झाला आहे. या पुरस्काराचे वितरण नाशिक येथील कालिदास मंदिरात आयोजित करण्यात आला होता.

वसंतराव घरटे हे आदिवासी समाजाच्या विकासासाठी परिश्रम घेत आहेत. शासनाने त्यांची दखल घेत आदिवासी सेवक पुरस्कार देण्यात आला. त्यांचे अभिनंदन आदिवासी विकास मंत्री डॉ विजयकुमार गावित, खासदार डॉ हिनाताई गावित, नंदुरबार जिल्हा परिषद अध्यक्ष सुप्रिया गावित, चंद्रजीत पाटील, ज्ञानेश्र्वर एखंडे, विकी कोकणी, खंडू शेठ, गोकुळ परदेशी, छगन राऊत, साहेबराव गांगुर्डे, किरण दहिते, ओमकार राऊत, विकास सोनवणे, सुरेश भापकर, विलास घरटे, डॉक्टर नरेंद्र भदाणे, दिलीप घरटे, शिवाजी घरटे, अरुण घरटे, प्रमोद भदाणे, सुरेश पुराणिक, संजय जगताप, बाळू काका तसेच तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जि प सदस्य, पंचायत समिती सदस्य, पिंपळनेर मंडळ सर्व पदधिकारी सामोडे गावाती ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. सामोडे गावात प्रथमच आदिवासी सेवक पुरस्कार मिळाला असुन यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

## क्रांतीसूर्य महात्मा फुले स्मृतीदिना निमित्त वरवाडे येथील ज्योतिबांच्या पुतळ्यास अभिवादन

**शिरपूर । प्रतिनिधी**



क्रांतीसूर्य महात्मा फुले स्मृतीदिना निमित्त वरवाडे येथील ज्योतिबांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

क्रांतीसूर्य तात्यासाहेब महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी नगराध्यक्ष तथा शिरपूर तालुका भाजपा प्रभारी प्रभाकरराव चव्हाण, भास्कर चव्हाण अमरावतीकर, अखिल भारतीय माळी महासंघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष वासुदेव देवरे, माजी उपनगराध्यक्ष काशिनाथ माळी, भाजपा तालुकाध्यक्ष किशोर माळी, माजी नगरसेवक दिपक माळी, नाशिक विभागीय सचिव भरत रोकडे, पुंडलिक माळी, न.पा.वाहन विभाग प्रमुख जयवंत माळी, अ.भा.माळी महासंघ धुळे जिल्हा उपाध्यक्ष संतोष माळी, शिरपूर पोलिस पाटील संघटना अध्यक्ष विनय माळी, न.पा.शिक्षण मंडळ सदस्य देविदास माळी, विठ्ठल लॉन्सचे भरत माळी, विनायक माळी, सा.कार्यकर्ता भालेराव माळी, श्री.म्हाळसादेवी मंदिर उपाध्यक्ष युवराज माळी, रामचंद्र ठाकरे, आर.जे.सोनवणे, संत सावता माळी मंदिर सदस्य बापु मास्तर, वसंत माळी, प्रमोद माळी, मोहन माळी, नितीन माळी, सतिष पाटील, योगेश राजपूत, दत्तु माळी, कैलास माळी, जयदेव माळी, संतोष माळी, पप्पु बारी, नाना वायरमन, भटु पाटोळे, महात्मा फुले अनुयायी यांनी वरवाडे येथील पूर्णाकृती महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यास व कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील महात्मा ज्योतीराव फुले व डॉ.आंबेडकर पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन त्यांच्या महान कार्याबद्दल उजाळा देऊन घोषणा दिल्या.

### धुळ्यात १८ डिसेंबर रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**धुळे ।** जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. त्यानुसार माहे डिसेंबर महिन्याचा महिला लोकशाही दिन १८ डिसेंबर, २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती राजेंद्र बिरारी, सदस्य सचिव महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धुळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

## देवरे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी अविष्कार स्पर्धेत मिळवले सुवर्णपदक व कांस्यपदक

**धुळे । प्रतिनिधी**




श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड अंतर्गत संत गाडगेबाबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी भुसावळ येथे नुकत्याच झालेल्या विभागीय अविष्कार स्पर्धेत सुवर्णपदक व कांस्यपदक मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत देवरे महाविद्यालयाचे महाविद्यालय स्तरावरील अविष्कार स्पर्धेचे विजेते बारा विद्यार्थी सहभागी झाले होते.

या विभागीय अविष्कार स्पर्धेत देवरे अभियांत्रिकी चा मेकॅनिकल शाखेचा विद्यार्थी खुशाल पिल्लाई याने ॲग्रीकल्चर व ॲनीमल हजबंडरी विद्याशाखेतून पेडल ऑपरेटेड रेट्रो लिफ्टिंग पंप फॉर ॲग्रीकल्चर सपोर्ट सिस्टीम हा प्रकल्प सादर करुन प्रथम क्रमांकावर येत सुवर्ण पदक मिळविले. तसेच देवरे अभियांत्रिकी चा मेकॅनिकल शाखेचा विद्यार्थी सौरव पाटील याने इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी विद्याशाखेतून सेल्फ हिटेड सोलर एअर हिटर हा प्रकल्प सादर करुन प्रथम क्रमांकावर येत सुवर्ण पदक मिळविले. देवरे अभियांत्रिकी चा मेकॅनिकल शाखेचा विद्यार्थी दिप्तेज शिंदे विज्ञान विद्याशाखेतून सस्टेनेबल व्हेंटीलेशन सोल्युशन फॉर थर्मल कंफर्ट हा प्रकल्प सादर करुन तृतीय क्रमांकावर येत कांस्यपदक मिळविले. हे तिघेही विद्यार्थी डीबाटू विद्यापीठ स्तरावर होणार्या अविष्कार स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. मेकॅनिकल शाखेतील या तिन्ही विजेत्या विद्यार्थ्यांना मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

## शेतकऱ्यांना मदत मिळाल्याशिवाय अधिवेशन चालू देणार नाही; विनायक राऊतांचा सरकारला इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

अवकाळीमुळे पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजारांची तात्काळ मदत करा, शेतकऱ्यांना मदत मिळाल्याशिवाय आमचे आमदार हिवाळी अधिवेशन चालू देणार नाही असा थेट इशारा ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी सरकारला दिला आहे. कालच पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शेतीच्या प्रश्र्नावरून सरकारला धारेवर धरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ठाकरे गटाचे नेते थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पोहोचले आहेत. नाशिकच्या इगतपुरी तालुक्यात विनायक राऊत, नितीन बानगुडे पाटील यांच्यासह नाशिकच्या ठाकरे गटाचे इतर स्थानिक पदाधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. पिक विमा कंपन्यांकडूनही मदत मिळत नाही, गेल्या वेळेच्या गारपीटीची देखील मदत सरकारने केली नाही, शेतकऱ्याना वाऱ्यावर सोडून सरकार बाहेर मौज मजा करत असल्याचा आरोप विनायक राऊत यांनी यावेळी एबीपी माझाशी बोलतांना केला आहे.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीने हाता तोंडाशी आलेलं पीक गेलं आहे. पण, तेलंगणामध्ये जाऊन लोचत गिरी सुरू आहे. दुसरीकडे राज्यातील शेतकरी टाहो फोडतो आहे. सरकारने आधार द्यायला पाहिजे, पण तसे होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळाल्याशिवाय आमचे आमदार अधिवेशन चालू देणार नाही, असे राऊत म्हणाले.

दरम्यान ठाकरे गटाचे नेते दत्ता दळवी यांच्यावर पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईबाबत बोलतांना राऊत म्हणाले की, सत्तेचा माज आलेल्या मिंधे सरकारने पोलिसांच्या बळाचा वापर करून दत्ता दळवी यांच्यावर कारवाई केली आहे.

### भुजबळांवर टीका...

**मराठा आणि ओबीसी तेढ निर्माण करण्यासाठी केंद्राकडून प्रयत्न सुरु आहे. महाराष्ट्रातले मंत्री व्यासपीठावर येऊन विसंवाद निर्माण करत आहे हे योग्य नाही. मंत्र्यांनी रस्त्यावर येऊन शड्डू ठोकणे योग्य नाही. मुख्यमंत्री यांच्या सांगण्यावरून हे होत असल्याचा संशय आहे. पण राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबद्दल मला कौतुक वाटत आहे. त्यांनी भुजबळ यांच्या भूमिकेबद्दल स्पष्ट बोलून धारिष्ट्य दाखवले ते मुख्यमंत्री यांनी दाखवायला पाहिजे. समाजात भांडण लावले जात असल्याचे देखील विनायक राऊत म्हणाले.**



### गद्दार गट भाजपच्या इशाऱ्यावर चालतोय...

**राज्यातील सत्ताधारी पक्षातील गट तटाच्या राजकारणावर देखील राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. गद्दार गट भाजपच्या इशाऱ्यावर चालत आहे. अजित पवार आणि शिंदे गट इतर राज्यात जाऊन प्रचार करतात. लोकांनी तिथं देखील यांचा धिक्कार केला असल्याचे, राऊत म्हणाले.**

## कु.निशा पाटील हिचा आ.पाटील यांच्या हस्ते सत्कार



**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील खोरदड येथील कुस्तीपटू कु.निशा राजेंद्र पाटील हिने ३३ किलो वजनगटात राज्यस्तरीय 'शालेय कुस्ती स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकविला आहे. नाशिक विभागात प्रथम क्रमांक आल्यानंतर कु.निशा पाटील हिची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील आणि सौ.अश्विनीताई कुणाल पाटील यांच्या हस्ते कु. निशा पाटील हीचा सत्कार करण्यात आला.यावेळी बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील,जि.प.सदस्य अरुण पाटील, खोरदड येथील विकास पाटील,राजेंद्र पाटील उपस्थित होते.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
शुक्रवार दि. १ डिसेंबर २०२३


# राज्य नाट्य स्पर्धेत 'संपेल का कधीही हा खेळ सावल्यांचा' नाटक सादर


## नाटकाला प्रेक्षकांची पसंती













जळगाव।
सुरवातीला नाटकाचा 'खेळ' असेच संबोधले जायचे. नाटक करता करता त्याचा खेळ होऊ नये याची संपूर्ण जबाबदारी नाट्यरुपी जहाजाच्या कॅप्टन वरच असते, दिग्दर्शकाला हा 'खेळ' जसा उमगला आहे यावर तो नाटकाचा खेळ तसा जमला आहे. हे सिद्ध होत असते. आता लेखकाचे माध्यम म्हणजे नाटक. नाटक है लेखकाचे असते, या नाटकाच्या खेळामध्ये एका इंग्लिश कथानकाचा आधार घेतला आहे. पाश्र्चात्य संकल्पना आपल्या इथल्या संपेल का कधी हा खेळ सावल्यांचा या नाटकातील क्षण. साच्यात बसवतांना लेखकाचा मात्र खेळ होतोय कि काय असे सारखे वाटत राहते. प्रेक्षकांशी तर खेळत नाहीये ना अस ही वाटत रहात. आता फॉर्मच तसा निवडला असेल तर अस समोर बसलेला प्रेक्षकांना वाटणे हाच खेळ खेळायचा आहे. प्रेक्षकांशी तर खेळत नाहीये ना अस ही वाटत रहात. एक कुटुंब आई- वडिल त्यांची मुले, त्यांचा संसार, आई-वडिल यां दोघांच क्रमा क्रमाने या मोहन आणि विकास यांच्या आयुष्यातून निघून जाणे, लहान असतात दोघेही, परंतू त्या घराच्या आठवणीत रमतात.





# बोराडी येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

## ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन केली जनजागृती













धुळे ।
एकच पंचायत समिती, शिरपूर व ग्रामपंचायत, बोराडी यांच्या संयुक्त विद्यमाने बोराडी ता. शिरपूर येथे आज विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न झाली. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गणेश मोरे, गटविकास अधिकारी एस.टी.सोनवणे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तालुक्यातील विविध गावांचे सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंपर्यंत केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पोहोचावा म्हणून केंद्र शासनातर्फे विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून ग्रामस्थांना शासनाच्या कृषी, आरोग्य, शेतकरी, महिला, युवा यांच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. तसेच लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात आले. यावेळी लाभार्थ्यांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झारखंड येथे झालेल्या प्रधानमंत्री महिला किसान ड्रोन केंद्र व जन औषध केंद्राचे लोकार्पण कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण ग्रामस्थांना दाखविण्यात आले.

संकलन : दिपक वाघ